संच : ब

# ४ थी मराठी

**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.**

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**

**शैक्षणिक प्रगती चाचणी**

**पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - चौथी**

**विषय : मराठी (लेखी)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ____________________

**शाळेचे नाव :** ____________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** ____ **शिक्षकाची स्वाक्षरी** ________ **एकूण गुण :** ३०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ____________________ २) ____________________

३) ____________________ ४) ____________________

५) ____________________ ६) ____________________

७) ____________________ ८) ____________________

९) ____________________ १०) ____________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.

वयाच्या १५ व्या वर्षी शंकररावांनी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे एक उपकरण बनवले. बराच वेळपर्यंत चार दिवे जळण्यास पुरेसा गॅस या यंत्रावर तयार होत असे. बालपणापासून शंकररावांची स्वाभाविक प्रवृत्ती शास्त्रीय आणि कलाकौशल्यांकडेही होती. शाळेतील घोकंपट्टीचा त्यांना मनस्वी कंटाळा होता.

इंग्लंडमध्ये भिसे यांनी प्रामुख्याने छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. इंग्लंडला बरीच वर्षे राहिल्यावर भिसे अमेरिकेला गेले. अमेरिकेत त्यांनी 'ऑटोमिडिन' (ॲटोमिक आयोडिन) या गुणकारी औषधाचा शोध लावला. पहिल्या महायुद्धात या औषधाचा जखमी सैनिकांवर उपयोग करण्यात आला. अमेरिकेत हे औषध लोकप्रिय झाले.

भिसे यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त न्यूयॉर्कमध्ये अनेक संस्थांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. संशोधन क्षेत्रात बहुमोल कामगिरी केल्याबद्दल त्यांना सन्मानपूर्वक पदव्या देण्यात आल्या. या सुमारास डॉ. भिसे यांची जगप्रसिद्ध संशोधक एडिसन यांच्याशी भेट झाली.

– ज. बा. कुलकर्णी

**प्रश्न २.** डॉ. भिसे यांना कोणत्या गोष्टीचा कंटाळा होता? (गुण १)

अ) अभ्यासाचा    ब) खेळण्याचा    क) घोकंपट्टीचा

**प्रश्न ३.** कोणत्या देशात डॉ. भिसे जास्त वर्षे राहिले? (गुण २)
तिथे त्यांनी कोणत्या क्षेत्रात जास्त शोध लावले?

___________________________________________

___________________________________________

**प्रश्न ४.** कोणत्या गुणांमुळे डॉ. भिसे संशोधनाकडे वळले असतील असे तुला वाटते? (गुण २)

___________________________________________

___________________________________________

___________________________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न ५ ते ७ साठी :** खालील जाहिरात वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

# खुशखबर! खुशखबर!! खुशखबर!!!

**'धमाल ग्रुप' पुणे आयोजित बालसाहित्य जत्रा**

**काय पहाल व काय घ्याल?**

१) बालकथा संग्रह
२) कविता संग्रह
३) बालनाट्य
४) एकांकिका संग्रह
५) नाट्यछटा व विनोदी पुस्तके
६) चित्रकला, हस्तकला संबंधी पुस्तके

**सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य!**

- प्रत्येक पुस्तकावर ५०% ची घसघशीत सूट
- बालकांसाठी निबंध लेखन, काव्यलेखन, चित्रकला स्पर्धा
- विजेत्यांना नामांकित लेखकांच्या हस्ते आकर्षक पुस्तकभेट!

- **'बालसाहित्य जत्रा' कालावधी : दि. १० जून ते १३ जून २०१७**
- **वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५**
- **स्थळ : महात्मा फुले सांस्कृतिक भवन, पुणे.**

**प्रश्न ५.** स्पर्धेतील विजेत्यांना कोणते बक्षीस मिळणार आहे? (गुण १)

अ) वस्तू ब) पुस्तक क) रोख रक्कम

**प्रश्न ६.** बालसाहित्य जत्रेतील पुस्तक खरेदी करणे फायद्याचे ठरेल का? (गुण २)
हे तुला कशावरून समजले?

______________________________

______________________________

**प्रश्न ७.** इयत्ता ५वी मधील लीलाच्या आजोबांना या 'बालसाहित्य जत्रेसाठी' जाता येईल का?
हे तुला कोणत्या वाक्यावरून समजले? (गुण २)

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न ८.** खालील वाक्यात ज्या शब्दाखाली रेघ मारली आहे त्या शब्दासाठी समानार्थी शब्द वापर आणि वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

आईने बनवलेले जेवण अगदी रुचकर होते.

______________________________

**प्रश्न ९.** खालील वाक्यात ज्या शब्दाखाली रेघ मारली आहे त्या शब्दासाठी विरुद्धार्थी शब्द वापर आणि वाक्य पुन्हा लिही. लक्षात ठेव, वाक्याचा अर्थ बदलू नकोस. (गुण १)

फारूख नेहमी खरे बोलतो.

______________________________

**प्रश्न १०.** गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द लिही. (गुण १)

झऱ्यातले पाणी ______________ वाहत होते.

(भरभर, सरसर, खळखळ)

**प्रश्न ११.** गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द लिही. (गुण १)

जंगलात हरणांचा ____________ सुंदर दिसत होता.

(कळप, थवा, समुदाय)

**प्रश्न १२.** योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

अगं चित्र दाखवतेस ना

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न १३.** खालील चित्र पहा आणि त्यावर एक गोष्ट लिही. (गुण ५)

रेल्वेस्थानकावरील चित्र : खूप गर्दी. एक माणूस बॅग ठेवून जातो.
एक मुलगी पोलीसांजवळ जाऊन त्यांना सांगते.



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th - B \Proof-II\19-06-17\GJ*

**संच : ब**

**प्रश्न १४.** खाली एका गोष्टीची सुरुवात दिली आहे ती गोष्ट पूर्ण कर. (गुण ५)

सानिया एक गरीब परंतु स्वाभिमानी मुलगी होती. ती आईला तिच्या प्रत्येक कामात मदत करायची. कामे उरकून ती शाळेत निघाली. रस्त्यात तिला मालकीणबाई भेटल्या. त्यांनी विचारले, ''सानिया आज आई कामावर का आली नाही?''



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th - B \Proof-II\19-06-17\GJ